**प्रेस नोट २४/०५/२०१९**
**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**
**घरातुन निघुन आलेल्या मुलीस ताब्यात दिलेबाबत.**

दि. २४/०५/२०१९ रोजी रात्रौ ००.३० वा चे सुमारास सी आर मोबाईल वरील कर्तव्य बजावीत असलेले पो.ना.घाडगे यांना एक मुलगी एकटीच शिवाजीनगर एस टी स्टॅन्ड येथे घाबरलेल्या आवस्थेत फिरत असताना मिळुन आल्याने,त्याबाबत त्यांनी लागलीच रात्रगस्त अधिकारी सपोनि.रणजित भोईटे यांना कळविले असता सपोनि.रणजित भोईटे यांनी महिला पोलीस कर्मचारी यांचे मदतीने मिळुन आलेली एक सज्ञान मुलगी,वय १९ वर्षे,रा.औसा,लातुर असे असल्याचे सांगितले. तीस पुणे येथे येण्याचे कारण विचारले असता तिने सांगितले की ती कॉलेज मधील मुलांशी बोलत असल्याचे तिचे आई-वडिलांना समजल्याने त्यांनी तिचे कॉलेजमध्ये जाणे बंद केले होते. पुढील शिक्षण व स्पर्धा परिक्षेचा अभ्यास करावयाचा असल्याने दि.२३/०५/२०१९ रोजी दुपारी १२.०० वा कोणास काहीएक न सांगता औसा येथुन शिवाजीनगर बस स्टॅन्ड येथे आली असल्याचे सांगितले. सदर मुलीकडुन तिचे वडिल यांचा मोबाईलवर संपर्क केला असता,त्यांनी सांगितले की त्यांचे मुलीस ताब्यात घेण्याकरीता दि.२४/०५/२०१९ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत पुणे येथे येत आहोत. तोपर्यंत तीला त्यांचे मित्र यांची पुणे मध्ये राहणारी मुलीचे ताब्यात देण्याबाबत कळविले असल्याने,सदर मुलीस पाहटे ०४.०० वा चे सुमारास तीचे ताब्यात देण्यात आलेले आहे.

वरील नमुद कामगिरी ही बाळासाहेब कोपनर वरिष्ठ पोलीस निरीक्षक,बापु शिंदे, पो. निरी.गुन्हे यांचे मार्गदर्शनाखाली सपोनि.रणजीत भोईटे, पो.ना.घाडगे, मपोना.शैलेजा साळवे, मपोशि.प्रियांका पानसरे यांनी केलेली आहे.

**वरिष्ठ पोलीस निरीक्षक,**
**शिवाजीनगर पोलीस ठाणे पुणे शहर**